# किरकोळ आणि वैयक्तिक खात्यांसाठी मायबँक इंडिया

## यू.पी.आय

**यू.पी.आय म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यू.पी.आय) आणि हा एक असा प्लॅटफॉर्म आहे जो नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एन.पी.सी.आय) या आर.बी.आय द्वारा नियंत्रित संस्थेने विविध बँकांमधील आंतर-कार्यक्षमता (इंटर-ऑपरेबिलिटी) सुलभ करण्यासाठी प्रदान केला आहे आणि विकसित केला आहे.**

हे खातेदारांना व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) या एकाच ओळख पटविणाऱ्यासह (आयडेंटिफायरसह) त्यांच्या स्मार्टफोनचा वापर करून, बँक खात्याची कोणतीही माहिती न घालता, त्वरित पैसे पाठवू देते आणि प्राप्त करू देते. त्यामुळे ग्राहकांना आदाता (पैसे घेणाऱ्याचा) किंवा प्रदाता (पैसे देणाऱ्याचा) यांचा आय.एफ.एस.सी कोड, बँक खात्याचा तपशील इत्यादी माहितीची गरज भासत नाही आणि त्यामुळे ही प्रक्रिया सोपी होते. ही सेवा, बँकांच्या सुट्ट्यांसह, 24 तास उपलब्ध असते.

### यू.पी.आय ची नोंदणी

- नोंदणी फक्त एकदाच करावयाची आहे आणि यू.पी.आय पहिल्यांदा वापरत असताना ते सूचित केले जाईल
- फूटर मेन्यू मधून किंवा हॅमबर्गर साइड मेन्यू मधून भीम यू.पी.आय आयकॉनवर क्लिक करा किंवा फंड ट्रान्सफर वर क्लिक करा आणि नंतर भीम यू.पी.आय पर्याय निवडा
- आपल्या नोंदविलेल्या मोबाइल क्रमांकावर प्राप्त ओ.टी.पी लिहा
- आपला वैयक्तिकृत व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) तयार करा किंवा सूचनांच्या यादीमधून एक निवडा
- पैसे पाठविण्यासाठी/ मिळण्यासाठी आपले बँक खाते लिंक करा
- आता आपल्याला भीम यू.पी.आय चा वापर सुरू करता येईल

### यू.पी.आय चा वापर करून पैसे पाठवा

- ट्रान्सफर टू व्ही.पी.ए पर्यायाचा वापर करून कोणत्याही पडताळलेल्या व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) वर पैसे पाठवा
- ट्रान्सफर टू अकाउंट पर्यायाचा वापर करून कोणत्याही खाते क्रमांकावर* पैसे पाठवा
- स्कॅन अँड पे पर्यायाचा वापर करून कोणत्याही क्यू.आर कोडवर पैसे पाठवा
- पडताळलेल्या व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) कडून मिळालेली कोणतीही पैसे मागण्याची विनंती मंजूर करून पैसे पाठवा

*आय.एफ.एस.सी कोड सुद्धा आवश्यक आहे

## यू.पी.आय चा वापर करून पैसे मिळवा

— कोणत्याही पडताळलेल्या व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस रिक्वेस्ट मनी पर्यायामधून पैसे मिळवा
— कोणत्याही पडताळलेल्या व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) मधून पैसे मिळण्यासाठी आपला वैयक्तिक क्यू.आर कोड तयार करा
— इतर व्ही.पी.ए ला पाठविलेली पैसे मिळण्याची विनंती प्रलंबित विनंती विभागात पाहता येईल. विनंत्या पाहण्यासाठी इतरांकडे प्रलंबित (पेंडिंग विथ अदर्स) बटणावर क्लिक करा

## व्यापारी देयके

— त्वरित देय भरण्यासाठी व्यापारी क्यू.आर कोड स्कॅन करा
— कोणत्याही व्यापारी संकेतस्थळावर आपला डॉइश बँकेचा व्ही.पी.ए पत्ता लिहा, देय भरण्यासाठी आपल्या मायबँक इंडिया ॲपवरून पैसे मिळण्याची विनंती मान्य करा
— पैसे मिळण्याच्या विनंत्या प्रलंबित विनंत्यांमध्ये पाहता येतील. प्रलंबित विनंत्यांकडे जा आणि पेंडिंग विथ मी बटणावर क्लिक करा

## व्ही.पी.ए व्यवस्थापित करा

— मॅनेज व्ही.पी.ए विभागातून आपल्या विद्यमान व्ही.पी.ए शी अतिरिक्त खाते लिंक करा
— आपल्याला अतिरिक्त व्ही.पी.ए तयार करता येतील
— आपल्याला मॅनेज व्ही.पी.ए विभागातून व्ही.पी.ए काढून टाकता येईल/ डी-लिंक करता येईल

## यू.पी.आय व्यवहाराचा इतिहास (ट्रान्झॅक्शन हिस्ट्री)

— मायबँक इंडिया ॲपवरून पाठविलेले पैसे सेंट मनी विभागांतर्गत पाहता येतील
— आपल्या डॉइश बँक व्ही.पी.ए चा वापर करून प्राप्त केलेले पैसे रिसिव्ह मनी विभागांतर्गत पाहता येतील

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यू.पी.आय) म्हणजे काय?

यू.पी.आय म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यू.पी.आय) एक अशी नवीन देय भरण्याची सुविधा आहे जी एन.पी.सी.आय ने ग्राहकांना प्रदान केलेली आहे. हे त्यांना व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए)/ यू.पी.आय आय.डी. या एकाच ओळख पटविणाऱ्यासह (आयडेंटिफायरसह) त्यांच्या स्मार्टफोनचा आणि टॅब्लेटचा वापर करून, बँक खात्याची कोणतीही माहिती न घालता, पैसे पाठवू देते आणि प्राप्त करू देते. त्यामुळे ग्राहकांना आदाता (पैसे घेणाऱ्याचा) किंवा प्रदाता (पैसे देणाऱ्याचा) यांचा आय.एफ.एस.सी कोड, बँक खात्याचा तपशील इत्यादी माहितीची गरज भासत नाही आणि त्यामुळे ही प्रक्रिया सोपी होते.

## व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए)/ यू.पी.आय आय.डी म्हणजे काय?

व्ही.पी.ए/ यू.पी.आय आय.डी एक ओळख पटविणारा (आयडेंटिफायर) आहे जो आपल्याला तयार करता येईल आणि आपल्या कोणत्याही बँक खात्याशी लिंक करता येईल जेणेकरून आपल्याला सुरक्षित देयके भरता येतील. व्ही.पी.ए/ यू.पी.आय आय.डी yourname@db* किंवा mobilenumber@db* किंवा इतर कोणतेही कॉम्बिनेशन* असू शकते जे लक्षात ठेवणे सोपे आहे.

*उपलब्धतेच्या अधीन असते

## व्ही.पी.ए/ यू.पी.आय आय.डी काय असू शकतो?

व्ही.पी.ए/ यू.पी.आय आय.डी अक्षरे, संख्यात्मक किंवा अल्फान्यूमेरिक असू शकतो. तो कमीत कमी 3 अक्षरांचा आणि जास्तीत जास्त 50 अक्षरांचा असावा. यात मान्य असलेले डॉट |.| हायफेन |-| अंडरस्कोअर|_| ॲट द रेट |@| वगळता कोणतेही विशेष वर्ण (चिन्ह) असू शकत नाहीत. आपला आय.डी लक्षात ठेवणे सोपे असावे जसे की yourname@db* किंवा mobilenumber@db*.

*उपलब्धतेच्या अधीन असतो

## मला व्ही.पी.ए कसे तयार करता येईल?

मायबँक इंडिया ॲपवर जा. भीम यू.पी.आय वर क्लिक करा, आपल्याला बँकेत नोंदविलेल्या आपल्या मोबाईल नंबरवर मिळालेला ओ.टी.पी लिहिण्यास सांगितले जाईल. त्यानंतर आपल्याला yourname@db* किंवा mobilenumber@db* सारखा व्ही.पी.ए निवडण्यासाठी स्क्रीन दाखविली जाईल. आपले स्वतःचे वैयक्तिकृत व्ही.पी.ए* आपल्याला सेट करता येईल किंवा सूचनांमधून निवडता येईल. नोंदवून झाल्यानंतर, यू.पी.आय च्या मॅनेज व्ही.पी.ए विभागातून आपल्याला अधिक व्ही.पी.ए जोडता येतील.

*उपलब्धतेच्या अधीन आहे

## यू.पी.आय चा वापर करून केलेल्या व्यवहारांसाठी काही शुल्क लागू होते का?

सध्या यू.पी.आय च्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांसाठी कोणतेही शुल्क लागू केले जात नाही.

## मला यू.पी.आय चा वापर करून पैसे कसे हस्तांतरित करता येतील?

— मायबँक इंडिया ॲपवर लॉगिन करा आणि भीम यू.पी.आय वर क्लिक करा
— "ट्रान्सफर टू व्ही.पी.ए" किंवा "ट्रान्सफर टू आकाउंट" द्वारे ट्रान्सफर मनी वर क्लिक करा
— स्क्रीनवर लाभार्थी व्ही.पी.ए किंवा खात्याचा तपशील, रक्कम आणि टिप्पण्या यासारखे तपशील भरा. आपल्याकडे एकाधिक खाती/ व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस असल्यास, आपला डिफॉल्ट व्ही.पी.ए डेबिटसाठी निवडला जाईल. प्रोसीड वर क्लिक करा

— कृपया सारांश पृष्ठावरील पुढील स्क्रीनचा बारकाईने आढावा घ्या, सबमिट करण्यासाठी आपले क्रेडेन्शियल्स त्यात लिहा

### असे कोणते वेगवेगळे प्रकार आहेत ज्यामधून यू.पी.आय चा वापर करून मला पैसे पाठविता येतील?

आय.एफ.एस.सी (लाभार्थीच्या खात्याचा तपशील) वापरून, लाभार्थीचा व्ही.पी.ए लिहून किंवा लाभार्थीचा क्यू.आर कोड स्कॅन करून आपल्याला पैसे पाठवविता येतील.

### यू.पी.आय चा वापर करून पैसे पाठवण्याची मर्यादा किती आहे?

आपल्याला प्रत्येक व्यवहारासाठी रु. 1 लाख पर्यंत यू.पी.आय व्यवहार करता येईल आणि एकूण रु. 1 लाख पर्यंत आणि जास्तीत जास्त 10 व्यवहार करता येतील.

### यू.पी.आय निधी हस्तांतरण (फंड ट्रान्सफर) मधून इतर निधी हस्तांतरण (फंड ट्रान्सफर) यंत्रणांच्या तुलनेत काय फायदा मिळतो?

सार्वजनिक सुट्टीच्या/ बँक सुट्टीच्या दिवशी सुद्धा ही सेवा त्वरित असते आणि 24 तास उपलब्ध असते. ग्राहकाला लाभार्थीचा व्हर्च्युअल पेमेंट अॅड्रेस देऊन सोप्या टप्प्यात निधी हस्तांतरित करता येईल. तसेच लाभार्थीसाठी कोणतीही पूर्वनोंदणी करण्याची गरज नाही.

### मला माझे यू.पी.आय व्यवहार कोठे पाहता येतील?

ट्रान्झॅक्शन हिस्ट्री पर्याय अंतर्गत आपल्याला आपले मागील व्यवहार पाहता येतील. हे ऑनलाइन बँकिंग आणि बँक स्टेटमेंट मध्ये सुद्धा प्रतिबिंबित होईल.

### मला यू.पी.आय च्या माध्यमातून पाठविलेल्या निधीसाठी देय थांबविण्याची (स्टॉप पेमेंट) विनंती देता येईल का?

नाही, एकदा देय देणे सुरू झाले की ते थांबविता येत नाही.

### यू.पी.आय चा वापर करून मला परदेशात पैसे पाठविता येतील का?

नाही, आपल्याला या पर्यायाचा वापर करून परदेशात पैसे पाठविता येणार नाहीत.

### मला यू.पी.आय अंतर्गत माझे एन.आर.ई/ एन.आर.ओ खाते लिंक करता येईल का?

नाही, एन.आर.ई/ एन.आर.ओ खाते यू.पी.आय साठी लिंक करता येणार नाही.

### माझा हँडसेट बदलल्यावर काय होते?

मायबँक इंडिया अॅपमध्ये लॉगिन केल्यानंतर आणि भीम यू.पी.आय वर क्लिक केल्यावर आपल्याला बँकेत नोंदविलेल्या मोबाइल नंबरवर आलेला ओ.टी.पी लिहावयाचा आहे.

## यू.पी.आय चा वापर करून पैसे मिळविताना, पैसे पाठविणाऱ्याने व्यवहारास अधिकृत केले आहे हे मला कसे कळेल?

भीम यू.पी.आय मध्ये प्रलंबित विनंत्यांच्या अंतर्गत इतर पर्यायांसह, पैसे पाठविणाऱ्याने अधिकृत करण्यासाठी प्रलंबित असलेली कोणतीही पैसे मिळविण्याची विनंती प्रलंबित म्हणून पाहता येईल.

## यू.पी.आय मध्ये माझ्या परवानगीसाठी प्रलंबित असलेल्या व्यवहारांची यादी मला कोठे सापडेल?

आपल्याला भीम यू.पी.आय मध्ये पेंडिंग विथ मी मेन्यू अंतर्गत माझ्याकडे प्रलंबित असलेल्या पैशासाठीच्या विनंत्या स्वीकारता येतील किंवा नाकारता येतील.

## यू.पी.आय अंतर्गत व्यवहार किती पटकन होतो?

यू.पी.आय अंतर्गत व्यवहार काही सेकंदात पूर्ण होतात.

सविस्तर अटी व शर्ती वाचण्यासाठी येथे क्लिक करा.